। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – ४२५००१**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001**

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/अभ्यास मंडळ अध्यक्ष/१७७/२०१८ दिनांक : ०५.०३.२०१८

प्रति,

१) उमविशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक.

२) मा. संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, उमवि, जळगाव.

३) सर्व संबंधित अभ्यास मंडळांचे मा. सदस्य.

**विषय : अभ्यास मंडळांचे अध्यक्ष निवडीसाठीचा निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलण्याबाबत..**

संदर्भ : १) उमवि/२/निवडणूक/१२८/२०१८, दिनांक २४.०२.२०१८
२) उमवि/२/निवडणूक/१२९/२०१८, दिनांक २४.०२.२०१८
३) उमवि/२/निवडणूक/१३०/२०१८, दिनांक २४.०२.२०१८
४) उमवि/२/निवडणूक/१३१/२०१८, दिनांक २४.०२.२०१८

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम ४० (२)(घ)(एक) मधील तरतुदीनुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांची निवड करण्यासाठी निवडणूक जाहिर करण्यात आली होती.

अभ्यास मंडळांचे गठण करण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम ४० (२)(ख) नुसार मा. कुलगुरू महोदयांकडून संबंधित विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांशी विचारविनिमय करून संबंधितांच्या कागदपत्रांची तपासणीच्या अधीन राहून अध्यापकांचे नामनिर्देशन केले होते. तथापि, अद्यापही काही नामनिर्देशित अध्यापकांची आवश्यक कागदपत्रे विद्यापीठास प्राप्त न झाल्याने संबंधितांच्या कागदपत्रांची छाननी प्रक्रिया पुर्ण करता आलेली नाही.

वरील विशेष परिस्थिती विचारात घेता, उपरोक्त प्रमाणे जाहिर केलेली विविध अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची निवड प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होणार नसल्यामुळे मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये सदरचा जाहिर केलेला निवडणूक कार्यक्रम तूर्त पुढे ढकलण्यात येत आहे. सुधारीत निवडणूक कार्यक्रम विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरील निवडणूक पोर्टलवर यथावकाश जाहिर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.भा. पाटील)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.: ०२५७–२२५७१००, २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७–२२५८४०३, ४०६
Post Box No. 80, Umavinagar, Jalgaon- 425 001 (M.S.) INDIA
Telephone Nos. : 0257-2257100, 2258428, 2258429. Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in